# – प्रवासिनी प्रतिमा –

When you are happy, travel to celebrate!
When you are sad, travel to forget and
when nothing happens, travel to expect
surprises!!

खरंच आहे ना! भटकंतीची खरी आवड असणाऱ्यांना महिनाभर काही घरात स्वस्थ बसवत नाही. वेगवेगळी अनवट ठिकाणे त्यांना साद घालतच असतात. एक बॅग रिकामी होऊन जागेवर जाईपर्यंत पुढची बॅग भरायची वेळ येते. आणि प्रत्येकवेळी प्रवासाहून परतताना मनाच्या गाठोड्यात नवनव्या अनुभवांची भर पडत जाते. अनुभवविश्व समृद्ध होणं हेच तर प्रवासाचे फलित असावे.

केल्याने देशाटन पंडित मैत्री सभेत संचार। या गोष्टींमुळेच माणसाला चातुर्य येते. खरं तर भूगोल हा पुस्तक वाचून शिकायचा विषयच नाही. त्या त्या मातीशी, हवामानाशी, जनजीवनाशी समरस होत समजावून घेण्याचा हा विषय आहे. आणि वेगळ्या शब्दात सांगायचं झालं तर व्यक्तिमत्व विकासाचा एक अविभाज्य घटक आहे प्रवास! प्रवासाने जसा माणूस घडतो ना तसा इतर साधनांनी नाही घडत! पण हा प्रवास नेहमीच सुखदायक असेलच असे नाही. कारण प्रवास म्हटला म्हणजे अडचणी आल्याच. अनेकदा गाडी चुकते अनपेक्षित संकटे समोर उभी ठाकतात. Routine बिघडते.

अगदी बसचा लांबचा प्रवास असला तर लहानशा जागेत अंग अवघडून बसण्याची किमया साधायला हवी. रेल्वेच्या प्रवासात वरचा बर्थ मिळाला तर सरसर वर चढता यायला हवे. अर्थात शरीर चपळ व काटक असेल तर कोणतीही अडचण येणार नाही. विमानप्रवास सुखाचा मानला जात असला तरी त्यातील अडचणी, कंटाळवाणी प्रतीक्षा अगदी अंत पाहते. थोडक्यात काय तर, प्रवास म्हटला की Adjustment आलीच. मग या सर्व अडचणी कशासाठी सोसायच्या? सुखाचा जीव दुःखात कशाला घालायचा? चांगलं सुखाने घरी बसायचं सोडून विकतचं दुखणं कशासाठी घ्यायचं?

या सगळ्यांचं उत्तर एकच! आनंद, अपार आनंद! या आनंदाचं पारडं इतकं जड होतं ना की त्यापुढे या साऱ्या अडचणी

© www.madhaveeragnuveer.com

कौतुक वाटतात. दूरवर दिसणार सुखनिधान खुणावत असतं की मग या छोट्या-मोठ्या अडथळ्यांचं काही वाटेनासं होतं.

कित्येकदा तर सहनशक्तीचा अगदी कस लागतो. मात्र प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्याला साथ देते ती आपली प्रकृति! तब्येत ठणठणीत असेल तर मग विमानापासून ते अगदी बैलगाडीपर्यंत आणि घोड्यावरच्या रपेटीपासून ते अगदी क्रूझपर्यंत कशाचाही त्रास होत नाही. उलट आनंदाच्या नाना परी अनुभवता येतात. आणि अर्थातच या जोडीला हवा तो सकारात्मक दृष्टीकोन!

अशीच माझी मैत्रिण 'प्रतिमा', अगदी भटकभवानी! तिला प्रवासाची इतकी आवड की ती घरी सापडणे म्हणजे कपिलाषष्ठीचा योगच म्हणावे लागेल. पण त्यामुळेच ती सदैव प्रफुल्लित उल्हसित असते. कधीच दुर्मुखलेली नाही. तिच्याकडे अनुभवांचे भांडार आहे. आणि प्रवासातील गमती-जमती, किस्से रंगवून सांगायची हातोटी पण आहे. आम्ही विचारतो तिला की सारखा प्रवास करून तुला कंटाळा नाही का ग येत? यावर तिचं उत्तर असतं की, अगं कंटाळा पळवून लावण्यासाठीच तर मी प्रवास करते. मुख्य म्हणजे भरपूर प्रवासाने तब्येत छान राहते आणि तब्येत छान असली की प्रवास सुखाचा होतो. दोन्ही गोष्टी एकमेकांना पूरकच आहेत. खरंच उत्साहाचं कारंजच आहे प्रतिमा!

आणि मुख्य म्हणजे तिच्या प्रवासाला कोणतीही मर्यादा नाही, बंधन नाही. म्हणजे अगदी घरगुती कार्यासाठी केलेला प्रवास असो, पर्यटनस्थळे पाहण्यासाठी असो, धार्मिक किंवा तीर्थयात्रा असो किंवा अगदी साहसी प्रकार म्हणून केलेले पर्वतारोहण असो! प्रतिमाचे पाऊल सर्वात पुढे! अर्थात जसे प्रवासाचे हेतू वेगवेगळे तशी प्रवासाची साधनेही निरनिराळी! Sports Shoes घालून केलेली जंगलभ्रमंती असो किंवा श्रीमंती थाटात अगदी Business Class ने केलेली विमानफेरी असो. स्टार हॉटेलमधील फाइव्ह कोर्स लंच असो की धाब्यावरच्या ॲल्युमिनियमच्या ताटलीत वाढली जाणारी पिठलं भाकरी असो! प्रतिमा तितक्याच समरसतेने या सगळ्याचा आस्वाद घेते. आणि ह्या सगळ्याचा आनंद असोशीने उपभोगताना स्वत: आनंद घेत दुसऱ्यांना मदत करण्याचा तिचा स्वभाव तर

© www.madhaveeraghuveer.com

अगदी लाखात एक म्हणावा असा! मला तिच्या याच गुणाचे मोठे कौतुक वाटते. जीवनाच्या प्रत्येक अंगाचा असा रसरसून आस्वाद घेणे तिला कसे जमते कुणास ठाऊक! ट्रेकिंग, हायकिंग, रॅपलिंग यामध्ये तर क्षणोक्षणी तुमच्या प्रकृतीची, सहनशक्तीची कसोटी लागत असते. पण अशाच वेळी उत्कटतेने जगलेल्या प्रत्येक क्षणाची किंमत उमगत जाते. याला जीवन ऐसे नाव! हेच खरे!

हे झाले प्रवासाबद्दल! पण जिथे पोहोचायचे त्या मुक्कामाला पोहोचल्यावर तर आणखी वेगळेच प्रकरण समोर उभे ठाकते. पर्यटक म्हणून आपण जेव्हा एखाद्या प्रेक्षणीय स्थळी जातो तेव्हा सर्वात प्रथम काय घडते, तर आपले Routine विस्कळित होते. सकाळी उठण्याच्या, झोपण्याच्या, आंघोळीच्या, जेवणाच्या सगळ्या वेळा बदलतात. वेळापत्रक कोलमडते. कधी भल्या पहाटे उठावे लागते तर कधी रात्री उशीरापर्यंत जागावे लागते. आणि हे सगळं जमवून आणताना शरीर खणखणीत आणि मन लवचिक हवे. सारख्या तक्रारी करणाऱ्या माणसाचा त्रास इतरांना तर होतोच पण त्याला स्वतःला सुद्धा होतो. आणि मग रंगाचा बेरंग होतो. सहलीचा आनंद झाकोळून जातो. मात्र अशी परिस्थिती कुठेही आढळली तरी प्रतिमा तिथे धावून जाते. मदतीचा हात देते. लहान मुलांना जोक्स सांगून हसवते. तर ज्येष्ठ नागरिकांना बसमधून चढउतार करताना मदतीचा हात देते. त्यामुळे प्रवासकाळात सगळ्यांच्या तोंडात 'प्रतिमा'चे नाव असतेच. तिच्याकडे बऱ्याच दुखण्यावरच्या औषधाच्या गोळ्याही असतात. आणि आवळा सुपारी तर तिच्या पर्समध्ये असतेच असते. त्यामुळे कोणाला गाडी लागत असली किंवा तोंडाची चव गेली असेल, तर प्रतिमाकडे त्यावरचा उपाय असतोच असतो.

प्रवासामध्ये इतक्या विविध स्वभावाच्या व्यक्ती एकत्र आलेल्या असतात की या सगळ्यांची मोट बांधणे हे संयोजकांच्या दृष्टीने आव्हानच असते. आणि जेवणाखाण्याच्या बाबतीत हे आणखीनच कठीण होऊन बसते. प्रत्येकवेळी आपल्याला रुचेल, पचेल असे पदार्थ मिळतीलच असे नाही ना! कुणाला झणझणीत जेवण हवे तर कुणाला तिखट अजिबात सहन होत नाही. शिवाय ज्या ठिकाणी सहलीचा मुक्काम असेल तिथे सर्व प्रकारच्या वस्तू उपलब्ध असतीलच असे

© www.madhaveeraghuveer.com

नाही. तेव्हा प्रत्येकाने थोडा संयम बाळगला, थोडी मनाला मुरड घातली तर सगळं काही सोपं होऊन जाते. आपल्या जिभेचे चोचले थोडेसे बाजूला ठेवून इतरांच्या आवडी-निवडीची कदर करणे सगळ्यांनाच जमते असे नाही. पण प्रतिमाला ही कलादेखील उत्तम साधली आहे. ती कॅरॅमल पुडिंगचा आस्वाद ज्या रसिकतेने घेते तितकाच तिला टपरीवरचा चहा देखील अमृततुल्य वाटतो. आणि तिचं पाहून इतरांनाही आपल्या नखरेखोर स्वभावाचे वैषम्य वाटते आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याचा त्यांचा पहिला धडा सुरु होतो.

देशातील असो किंवा विदेशातील असो, पर्यटनस्थळे पाहताना शारीरिक क्षमतांचा अगदी कस लागतो. परदेशातील Museums पाहताना किंवा आपल्याकडची Ramoji City पाहताना पायाचे अक्षरशः तुकडे पडतात असे वाटते. राजस्थानातील भव्य महाल बघण्यासाठी कधी अश्वरोहण करावे लागते तर हिमाचलमध्ये अति थंडीपासून बचाव करावा लागतो. मध्य प्रदेशातील मांडवगड सारखा उत्कृष्ट किल्ला पाहताना तळपत्या उन्हाचा सामना करावा लागतो. म्हणजेच जगभरातली उत्तमोत्तम स्थाने पहायची असतील तर सगळीकडे शेवटपर्यंत गाडी नाही उपलब्ध होणार! दक्षिणेकडील अनेक मंदिरात तर अनवाणी चालावे लागते तरच तिथल्या कोरीव कामाचा, लेण्यांचा आनंद लुटता येतो. आणि असा होकारात्मक दृष्टीकोन असेल तर मग दुखणाऱ्या पायांचं काही वैषम्य वाटत नाही. मात्र वयोमानानुसार असेल किंवा दुखणाऱ्या पायांमुळे असेल कितीतरी लोक गाईड जी माहिती सांगतो आहे तिथपर्यंत पोहोचू शकत नाही. प्रतिमा मात्र स्वतः ती माहिती लक्षपूर्वक ऐकते व थोडक्यात इतरांना सांगते.

एवढेच नाही तर Group photo काढायचा असेल तरी या बाईसाहेब कायमच तयार! त्यामुळेच ती सर्वांना हवीहवीशी वाटते. अगदी ८ वर्षाच्या अर्णवपासून ते ८० वर्षाच्या परवर्धन आजी तिच्या मैत्रीच्या धाग्याने घट्ट बांधल्या गेल्या आहेत. तिच्याकडे विषयांचे वैविध्य इतके आणि माणसं पारखण्याची व जोडण्याची कला असल्यामुळे तिच्या मित्रमंडळींमध्ये रोज नवनवी भरच पडते आहे. कोणालाही मदत करायला एका पायावर तयार!

© www.madhaveeraghuveer.com

आपत्ति व्यवस्थापनात तर तिचा हात कोणीच धरू शकणार नाही. कुणी अडचणीत आहे असं समजायचा अवकाश, प्रतिमा तिथे पोहोचलीच म्हणून समजा! कोणाची गाडी चुकली, कोणी धडपडले, कोणाच्या बॅगचे हॅंडल तुटले किंवा कुणी अचानक आजारी पडले तरी प्रत्येक गोष्टीवर हिच्याकडे उपाय असे. अनेकदा पदरमोड करूनही ही सगळ्यांसाठी झटत असते. तिच्या पोतडीमध्ये अनेक अद्भुत गोष्टींचा खजिना असतो. पत्ते, सुडोकु, छोटी मोठी कोडी यांचे भांडार ती बाळगून असते. आणि तरीदेखील तिचे सामान अगदी हलके सुटसुटीत! ८ दिवसाच्या प्रवासासाठी २ जीन्स व ४-५ टॉप्स तिला पुरेसे वाटतात. कारण तिच्या प्रवासाचे सूत्रच आहे. Travel Light! अत्यंत कमी पण तरीही अत्यावश्यक सामान कसे बाळगावे याचा वस्तुपाठच आहे प्रतिमा!

आणि नुसता प्रवासच नाही तर तिच्या आयुष्याचाही मूलमंत्र आहे – Travel Light! म्हणजे प्रवासात सामानाचे ओझे नाही आणि जीवनात इतरांकडून अपेक्षांचा भार नाही. असे जर वागता आले ना तर अपेक्षाभंगाचे दुःखही नाही. जीवन अगदी मोकळं हलकंफुलकं आणि आनंदी होऊन जाते मग!

अशी ही प्रतिमा आणि तिच्या प्रवासवेडाची ही कहाणी! तुम्हालाही अशी मैत्रिण असावीशी वाटतीय ना? किंवा तिच्याशी ओळख करून घ्यायची उत्सुकता आहे ना? अहो, मग आरशात बघा ना! ही प्रतिमा काही दुसरी तिसरी कोणी नाही! आपल्याच मनातल्या आदर्श मैत्रिणीचे नाव आहे प्रतिमा! आपण आपल्यातच डोकावून पाहूया आणि सगळे नाही पण निदान तिच्यातले काही गुण तरी आपल्यात आणता येतायत का ते बघूया. कितीतरी सुखकर आठवणी आपल्या मनाच्या पोतडीत भरू या. आणि आपणच होऊ या 'प्रवासिनी प्रतिमा!'

माधवी रघुवीर जोशी
डी-८०, वुडलँड, कोथरूड, पुणे
फोन - 020-25386964
9373366611

©www.madhaviraghuveer.com